नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ७८ Issue - 78 | वार सोमवार दि. ४ ऑगस्ट २०२५३ Blow- Monday Date 4 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## टॅरिफसह दंडाची धमकी वाया; भारताची रशियाकडून तेल खरेदी सुरुच राहणार

### चीन आणि भारत हे दोन देश रशियाच्या क्रूड ऑईलचे प्रमुख खरेदीदार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत सरकारनं देशातील रिफायनरी कंपन्यांना रशियाकडून तेल खरेदी न करण्याबाबत कोणताही आदेश दिलेला नाही. इकोनॉमिक्स टॉइम्सच्या रिपोर्टमध्ये हा दावा करण्यात आला आहे. सध्या भारत अमेरिकेच्या धमकी आणि आपल्या गरजांच्या नुसार निर्णय घेण्याबाबत विचार करत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन दिवसांपूर्वी मीडियासोबत बोलताना भारत जर रशियाकडून तेल खरेदी करणार नसेल तर चांगलं पाऊल असल्याचं म्हटलं होतं.



शनिवारी न्यूयॉर्क टाइम्सनं त्यांच्या रिपोर्टमध्ये म्हटलं की ट्रम्प यांच्या दंडाच्या धमकी नंतर देखील भारतानं रशियाकडून तेल खरेदी सुरु ठेवली जाईल. मात्र, भारत सरकारकडून या प्रकरणावर अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका समोर आलेली नाही. रिपोर्टनुसार रशियाकडून तेल खरेदी थांबवण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. सरकारी आणि खासगी तेल कंपन्यांना त्यांच्या पसंतीच्या विक्रेत्याकडून तेल खरेदी करण्याची परवानगी असेल, हा त्यांचा व्यापारी निर्णय असेल.

गेल्या आठवड्यात डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ आणि रशियाकडून शस्त्र आणि तेल खरेदी करत असल्यानं दंड देखील लादला होता. रशियासोबत भारतानं मैत्री कायम ठेवल्यानं हा दंड आकारण्यात आला होता. ब्लूमबर्गच्या रिपोर्टनुसार गेल्या आठवड्यात रिफायनरी कंपन्यांना रशियाच्या पर्यायांबाबत प्लॅन तयार ठेवण्याचे निर्देश सरकारकडून देण्यात आले आहेत. रिपोर्टनुसार कंपन्यांना विचारण्यात आलं रशियाचा पर्याय म्हणून कोण कोणते देश तेल खरेदीसाठी पर्याय ठरू शकतात. भारतानं रशियाकडून तेल खरेदी खरेदी कमी केल्यास पुन्हा एकदा आखाती देशांवरील अवलंबित्व वाढेल. त्यासाठी अधिक पैसे मोजावे लागतील. डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाला यूक्रेन सोबत सुरु असलेलं युद्ध थांबवण्याचा इशारा दिलेला आहे. रशियानं येत्या काही दिवसांमध्ये युद्ध न थांबवल्यास त्यांच्यासोबत व्यापार करणाऱ्या देशांना दुय्यम टॅरिफ द्यावं लागेल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. ट्रम्प रशिया आणि यूक्रेन युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. रशियाची आर्थिक कोंडी करण्याचा अमेरिका आणि त्यांच्या सहयोगी देशांचा प्रयत्न आहे. त्यामुळं रशियाकडून सवलतीच्या दरात क्रूड ऑईलची विक्री केली जात आहे. चीन आणि भारत हे दोन देश रशियाच्या क्रूड ऑईलचे प्रमुख खरेदीदार आहेत. त्यामुळं रशियाची आर्थिक नाकेबंदी करण्यासाठी ट्रम्प भारताला इशारा देत आहेत.

## बोलेरो कालव्यात कोसळली, अकरा जणांचा मृत्यू, ९ जण एकाच कुटुंबातील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लखनऊ : उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यात एक भीषण अपघात झाला. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला आहे. इटियाथोक पोलीस स्टेशन परिसरात दर्शनासाठी जाणारी बोलेरो गाडी अनियंत्रित होऊन कालव्यात उलटून हा अपघात झाला आहे. या बोलेरोमधून एकूण १५ जण प्रवास करत होते. त्यापैकी ११ जणांचा जागीच मृत्यू झाला. तर, काही जण गंभीर जखमी झाले आहेत. हे लोक दर्शनासाठी निघाले होते तेव्हा ही भयंकर घटना घडली. या घटनेतील मृतांपैकी नऊ जण हे एकाच कुटुंबातील असल्याची माहिती आहे.



याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, ही घटना गोंडा जिल्ह्यातील इटियाथोक पोलीस स्टेशन परिसरातील राहरा गावातील आहे. बोलेरोमधील सर्व लोक दर्शनासाठी जात होते. तेवढ्यात मुसळधार पावसामुळे गाडी अनियंत्रित होऊन थेट कालव्यात जाऊन पडली. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला आहे. तर, चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, बोलेरो गाडीत महिला आणि मुलांसह एकूण १५ जण होते. गाडी बेलवा बहुता माजरा रेहरा येथे पोहोचताच चालकाचा अचानक गाडीवरील ताबा सुटला आणि गाडी थेट सरयू कालव्यात जाऊन कोसळली. लोकांनी तात्काळ पोलिसांना याची माहिती दिली. माहिती मिळताच इटियाथोक पोलिस स्टेशन घटनास्थळी पोहोचले आणि स्थानिक लोकांच्या मदतीने बचाव कार्य सुरू केले. पोलिसांनी सर्व मृतदेह ताब्यात घेतले आहेत आणि पोस्टमॉर्टमसाठी पाठवले आहेत. या घटनेमुळे परिसरात एकच शोककळा पसरली आहे. मृतांच्या कुटुंबियांमध्ये शोककळा पसरली आहे आणि गावात शोककळा पसरली आहे. स्थानिक प्रशासनाने तातडीने मदत आणि बचाव कार्य सुरू केले आहे आणि बाधित कुटुंबियांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

या घटनेबाबत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शोक व्यक्त केला आहे आणि मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रशासकीय पथकं मदत आणि बचाव कार्यात गुंतली आहेत.

## पै. माऊली काळे यांच्या पक्षप्रवेशाने नगरपालिका निवडणुकीत पक्षाला लाभ होईल : अनिल दादा सावंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील नामवंत पैलवान माऊली आबा काळे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट या पक्षामध्ये अनिल सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट या पक्षामध्ये आज रोजी प्रवेश केला पैलवान माऊली आबा काळे यांच्या संवेद असंख्य तरुणांनी आज रोजी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट पंढरपूर या पक्षाला पंढरपूर तालुका मधून पक्षाला बळकटी देण्याचे कार्य होणार आहे. येत्या पंढरपूर नगरपालिका निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पक्षाला पैलवान माऊली काळे व वेंगेकर बंधू यांच्यामुळे पक्षाला लाभ होणार आहे असे मनोगत अनिल दादा सावंत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते यांनी व्यक्त केली.



येणाऱ्या पंढरपूर नगरपालिका तसेच पंचायत समिती जिल्हा परिषद अशा विविध निवडणुकीमध्ये पैलवान माऊली काळे व गंगीकर यांच्यासह आणि कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष हा मोठा करण्यात मदत करतील अशी अपेक्षा देखील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते अनिल दादा सावंत यांनी व्यक्त केले.

येत्या काही दिवसात पक्षाचे ज्येष्ठ नेते सुप्रियाताई सुळे तसेच प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून परमानळी काळी यांना मोठी पद मिळणार असून या पदाचा पैलवान मावळीकडे यांनी पक्ष वाढीसाठी व त्यांचे कार्यकर्त्याला सामावून घेऊन जास्तीत जास्त पक्षाचे ध्येय धोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम करणार असल्याचे पैलवान माऊली काळे यांनी आश्वासन दिले.

## अवयवदान पंधरवड्यास सुरुवात; आजपासून राज्यात जनजागृतीपर विविध उपक्रम

**सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतली अवयवादानाची शपथ**

मुंबई : राज्यातील अवयवदानाचे प्रमाण वाढावे व अवयवदानाच्या प्रतीक्षेतील रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी आजपासून विविध उपक्रमांनी अवयवदान पंधरवडा साजरा होत आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वत: पुढाकार घेत अर्ज भरून अवयवादानाची शपथ घेतली आणि या अभियानाचा शुभारंभ केला. राज्यातील जनतेने या अभियानामध्ये सहभागी होऊन अवयवदानाची शपथ घ्यावी, असे आवाहन आरोग्यमंत्री आबिटकर यांनी केले आहे.

अंगदान जीवनदान संजीवनी अभियान ३ ऑगस्ट ते १५ ऑगस्टदरम्यान राज्यात राबविण्यात येत आहे. या कालावधीत व्यापक जनजागृती व समाजाभिमुख उपक्रम राबवण्याचे निर्देश मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. या अभियानामध्ये शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था, आरोग्य संस्था व सामाजिक कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग असणार आहे. अवयवदान क्षेत्रात देश आणि राज्य स्तरावर काम करणाऱ्या संस्था रोट्टो, सोट्टो, विभागीय प्रत्यारोपण समन्वय समित्यां व झेडटीसीसी, मुंबई, पुणे नागपूर व छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने हे अभियान राज्यभरात राबविण्यात येणार आहे. अवयवदान ही एक सामाजिक बांधिलकी आहे. समाजामध्ये या विषयाबाबत सकारात्मक मतपरिवर्तन घडवण्यासाठी प्रभावी जनजागृती अत्यावश्यक आहे. मोहिमेतून अवयवदानासंबंधी भीती, गैरसमज व अंधश्रद्धा दूर करून वैज्ञानिक माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे महत्त्वाचे आहे. या पंधरवड्यात राज्यातील प्रत्येक जिल्हा, तालुका व आरोग्य संस्था स्तरावर, शाळा, महाविद्यालये येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, १५ ऑगस्ट रोजी जिल्हास्तरावर पालकमत्र्यांचे हस्ते अवयवदात्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करून मोहिमेला प्रेरणादायी रूप दिले जाणार आहे. राज्यात अवयवदानाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवून, महाराष्ट्राला या क्षेत्रात आघाडीवर नेणे हे या उपक्रमामागील उद्दिष्ट आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने या मोहिमेला जनतेच्या सक्रीय सहभागाने यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## कुणालाही भाषेच्या आधारावर मारलं तर कारवाई करणारच, देवेंद्र फडणवीस यांचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा इशारा दिला आहे. ते एका मुलाखतीत बोलत होते. हे चुकीचं आहे. कुणालाही भाषेच्या आधारावर मारणं योग्य नाही. महाराष्ट्रात तुम्ही राहतात म्हणून तुम्हाला मराठी आली पाहिजे हा आग्रह ठिक आहे. पण हा दुराग्रह होता कामा नये. तुम्ही कुणी मराठी बोलत नाही यासाठी कुणाला मारु शकत नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. यावेळी त्यांनी मंत्री नितेश राणे यांचं वक्तव्यदेखील चुकीचं असल्याचं म्हटलं.

नितेश राणे जे बोलले ते चुकीचं आहे. त्यांना खरंतर वेगळं बोलायचं होतं. त्यांचं म्हणणं होतं की, तुम्ही मराठी येत नाही म्हणून हिंदूंना मारत आहेत. इतर लोकं देखील आहेत ज्यांना मराठी बोलत नाहीत त्यांना का मारत नाहीत? नितेश राणे जे बोलले ते एकप्रकारे बरोबर आहे आणि दुसरीकडे चुकीचं देखील आहे. केवळ भाषेच्या आधारावर किंवा कोणत्या धर्माची लोकं ही भाषा बोलत नाहीत या आधारावर हे डिस्क्रिमिनेट होऊ शकत नाही. हे चुकीचं आहे. त्यामुळे अशा भाषेचा वापर व्हायला नको, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मराठी बोलता येत नाही म्हणून मारहाण झाल्याच्या दोन-तीन घटना निश्चित झाल्या आहेत. जो घटना करणार त्याच्यावर आमचं सरकार कारवाई करणार. मी आधी हे सांगतो की, महाराष्ट्रात मराठी शिकण्याची सक्ती आहे. आम्ही ती सक्तीची केली आहे. त्याबाबत आमचं कोणतंही कॉम्प्रमाईज नाही. महाराष्ट्रात मराठी बोलली गेली पाहिजे असा आग्रह करणं चुकीचं नाही. पण कुणी मराठी बोलू शकत नाही तर त्याला तुम्ही मारणार हे आमच्या सरकारला मंजूर नाही. असं जो करणार त्यावर आम्ही कारवाई करणार म्हणजे करणार, असं देवेंद्र फडणवीस स्पष्ट म्हणाले.

### घातक शस्त्रांसह साडेसात लाखांचा मुद्देमाल जप्त

## दरोडा टाकणारी बीड जिल्ह्यातील टोळी लातूरमध्ये जेरबंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : लातूर जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून घरफोडी आणि दुकानांवर चोरीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण होतं. पोलिसांनी या प्रकरणाचा माग काढत अखेर बीड जिल्ह्यातील सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा पर्दाफाश करत त्यांना घातक शस्त्रांसह अटक केली आहे. औसा आणि भादा पोलिसांनी नागरिकांच्या सतर्कतेच्या आधारावर सिंघाळा-शिवली मोड परिसरात एका संशयास्पद अशोक लेलँड टेम्पोला अडवून कारवाई केली. पाच संशयितांना ताब्यात घेण्यात आलं असून, तीन जण अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले आहेत.



दरम्यान, पोलिसांनी या सराईत गुन्हेगारांकडून धारदार शस्त्र, हत्यारे जप्त केली आहेत. एकूण सात लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. लातूर शहर लातूर ग्रामीण एमआयडीसी पोलीस ठाणे, औसा, भादा, निलंगा उदगीर या भागात या टोळीने सातत्याने घरफोडीचे काम केली आहेत. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात या टोळीने गुन्हे केले आहेत का? याचा तपास लातूर पोलीस करत आहेत.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून लातूर जिल्ह्यामध्ये चोरीच्या आणि घडफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. यामुळं नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण होतं. पोलिस देखील चोरांचा शोध घेत होते. आज अखेर लातूर पोलिसांनी बीड जिल्ह्यातील दरोडेखोरांच्या टोळीला जेरबंद केलं आहे. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या चोरांकडे घातक शस्त्रे देखील आढळून आली आहेत. पूर्ण नियोजन करुन हे दरोडेखोर चोरी करत असल्याचं यावरुन दिसून येत आहे. शस्त्रांसह पोलिसांना एकूण साडेसात लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या विविध भागात चोरीच्या घटना वाढल्याचे दिसत आहे. काही ठिकाणी तर दिवसा देखील घरफोडीच्या घटना घडत आहेत. तसेच रस्त्यावर देखील महिलांच्या गळातील सोने चोरल्याच्या घटना घडताना दिसत आहेत. तसेच दुचाकी चोरीच्या घटना देखील राज्याच्या काही भागात घडल्या आहेत. दरम्या, अशा घटना वाढत असल्यामुळं पोलिसांनी गस्त वाढवावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तसेच वेगानं अशा प्रकरणांचा तपास करावा अशी मागणी नागरिक करताना दिसत आहेत.

## सामाजिक न्याय मंत्री शिरसाट, रोजगार मंत्री गोगावले आज माळशिरस तालुका दौऱ्यावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी:

सामाजिक न्याय मंत्री ना. संजय शिरसाट व रोजगार हमी मंत्री ना. भरत शेठ गोगावले यांच्या माळशिरस तालुका दौरा जाहीर झाला आहे. ना. संजय शिरसाट व ना भरत शेठ गोगावले यांची भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माळशिरस विधानसभेचे लोकप्रिय दमदार माजी आमदार राम सातपुते यांच्या श्रीराम निवासस्थानी आगमन.

महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजना फलोत्पादन वखार भूमी विकास मंत्री नामदार भरत शेठ गोगावले व महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याची पालकमंत्री नामदार संजयजी शिरसाट यांचा सोमवारी दिनांक





चार ऑगस्ट २०२५ रोजी माळशिरस तालुका दौरा जाहीर झालेला असून भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माळशिरस विधानसभेचे लोकप्रिय दमदार माजी आमदार राम सातपुते यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट अशा शासकीय दौरा जाहीर झालेला आहे.

## संपादकीय....

### खडतर वाट

सध्या भारत अमेरिकेच्या धमकी आणि आपल्या गरजांच्या नुसार निर्णय घेण्याबाबत विचार करत आहे. ट्रम्प यांच्या दंडाच्या धमकी नंतर देखील भारतानं रशियाकडून तेल खरेदी सुरु ठेवली जाईल. मात्र, भारत सरकारकडून या प्रकरणावर अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका समोर आलेली नाही. रिपोर्टनुसार रशियाकडून तेल खरेदी थांबवण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. सरकारी आणि खासगी तेल कंपन्यांना त्यांच्या पसंतीच्या विक्रेत्याकडून तेल खरेदी करण्याची परवानगी असेल, हा त्यांचा व्यापारी निर्णय असेल. गेल्या आठवड्यात डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ आणि रशियाकडून शस्त्र आणि तेल खरेदी करत असल्यानं दंड देखील लादला होता. रशियासोबत भारतानं मैत्री कायम ठेवल्यानं हा दंड आकारण्यात आला होता. दरम्यान ब्रिटन आणि भारत या दोन देशांमधला द्विपक्षीय मुक्त व्यापार करार स्वतःचे वेगळेपण घेऊन आला आहे. हे वेगळेपण आहे त्याच्या 'ऐतिहासिक' असण्यात. हा करार ऐतिहासिक आहे कारण पहिल्या प्रथम पाश्चिमात्य देशाशी केलेला, आकाराने मोठा व्यापार करार आहे. ब्रिटनमध्ये व्यवसायासाठी जाणाऱ्या भारतीय व्यावसायिकांवर कोणतेही संख्यात्मक नियंत्रण घातले जाणार नाही. दोन्हीकडचे व्यवसाय कसे वाढतील, हे पुढच्या बारा महिन्यांमध्ये पाहिले जाईल. या कराराने 'भारत-ब्रिटन द्वि योगदान कन्व्हेंशन'ची घोषणा केली आहे. यामुळे ब्रिटनमधल्या भारतीय कंपन्यांना त्यांच्या कामगारांसाठी तीन वर्षांसाठी कोणताही सामाजिक सुरक्षा निधी उभारावा लागणार नाही. त्यामुळे भारतीय कंपन्यांच्या या खर्चामध्ये बचत होऊन, सुरवातीच्या संभाव्य गुंतवणुकीसाठी फायदाच होईल. त्याचबरोबर भारतीय सरकारी कंपन्यांमध्ये संपादनासाठी ब्रिटनमधल्या वस्तू पुरवठादारांना खुला प्रवेश देऊ केला आहे. भारताच्या पूर्वीच्या 'संरक्षणवादी धोरणा'पासून ही खूप मोठी फारकत आहे. युरोपियन युनियन, अमेरिका यांच्या दृष्टीने त्या देशांमधील संपादन क्षेत्राबाबत असाच कित्ता गिरविता येईल. यामुळे मुक्त व्यापारात एक नवीन पायंडा पडून भारतासारख्या देशाला आयात पर्यायता, देशातल्या उद्योगांच्या क्षमतेत वाढ, रोजगार निर्मिती यासारख्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अधिक पूरक धोरण आखता येईल. या करारात डेअरी, खाद्यतेले आणि सफरचंदे या गोष्टींचा समावेश नाही. चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, भाजीपाला त्याचबरोबर शेती वस्तूंच्या निर्यातीवर कोणतेही शुल्क असणार नाही. त्यामुळे भारताच्या कृषी क्षेत्रातील निर्यात पुढच्या तीन वर्षात २० टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे. कापड उद्योग, रासायनिक उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग या श्रमप्रधान उद्योगांना उत्तेजन मिळून त्यातून रोजगार निर्मितीला वाव मिळेल. अन्नप्रक्रिया उद्योगाला निर्यातीसाठी आत्तापर्यंत ७० टक्के शुल्क भरावा लागत होता; तो आता शून्य टक्क्यावर येईल. त्याचप्रमाणे ५४० कोटी डॉलरचे मूल्य असलेल्या सागरी उद्योग क्षेत्रात भारतीय उद्योगांना विनाशुल्क प्रवेश मिळेल. सागरी उद्योगाच्या निर्यातीत भारताचा हिस्सा फक्त २.२५ टक्के आहे. या करारातून पुढच्या पाच वर्षात त्यात वाढ अपेक्षित आहे.

# येळी येथील जागृत रामलिंगेश्वर मंदिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा तालुक्यातील येळी येथील जागृत रामलिंगेश्वर मंदिराचे परिसरात मोठे महात्म्य आहे. श्री शंभो महादेवाचा अवतार असलेल्या मंदिरात वालुकामय स्वयंभू लिंग आहे. त्यांच्या दर्शनासाठी मंदिरात भाविकांची नियमित गर्दी असतेच, त्यापेक्षा श्रावण महिन्यानिमित्ताने परिसरातील भाविकांचा दर्शनासाठी ओघ सुरू असतो.

साधारणतः सव्वाशे वर्षांपूर्वी मंदिर उभारले असावे. दगडी बांधकाम अन् साधारणतः १५ फूट उंचीचे शिखर होते. समोरच्या बाजूला दोन खोल्या एवढ्या जागेत लाकडी इमला होता. तीन वर्षांपूर्वी ग्रामस्थांनी लोकसहभागातून ५० लाख रुपये खर्चुन मंदिराचा जीर्णोद्धार केला. मंदिराच्या शिखराची उंची जमिनीपासून ५१ फूट आहे. माजी राज्यमंत्री बसवराज पाटील यांनी आमदार निधीतून मंदिराच्या बाजूला सभागृह बांधून दिले आहे. दरम्यान, जीर्णोद्धाराचे काम करताना दीपमाळ पाडताना मोठे दगड लागले. त्याखालील बाजूला संजीवन समाधी असल्याचे दिसून आले. तीन मूर्ती, एक दीपज्योत आढळून आल्यानंतर ग्राम पंचायतीने तेरच्या पुरातन विभागाकडे या अवशेषांची माहिती मागविली होती. साधारणतः १६ व्या शतकातील हे अवशेष असल्याचा प्राथमिक निष्कर्ष काढला होता. विशेष म्हणजे मंदिरातील स्वयंभू लिंगाच्या सरळ रेषेत संजीवन समाधी असल्याचे दिसून आल्याने ग्रामस्थांनी त्या ठिकाणी चबुतरा बांधला आहे.

सव्वाशे वर्षांपूर्वी मंदिराची स्थापना झाल्याचे पूर्वज सांगतात. मंदिरात वालुकामय स्वयंभू लिंगाच्या दर्शनाने मन प्रसन्न राहते आणि आत्मिक समाधान मिळते. ग्रामस्थांनी मंदिराचे पावित्र्य जपत जीर्णोद्धार केला आहे. परिसरातील असंख्य भाविक दर्शनासाठी येतात. सूर्याचे पहिले किरणे स्वयंभू लिंगावर पडतात.

**– उमरगा –ज्ञानेश्वर गुरव**

### महिला करतात दररोज रुद्राभिषेक

**श्रावणमासानिमित्त मूर्तीला दररोज रुद्राभिषेक करण्यात येत आहे. महालक्ष्मी सणाच्या तिसऱ्या दिवसापर्यंत तीन सप्टेंबरपर्यंत ४० दिवस रुद्राभिषेक करण्याचे नियोजन महिलांनी केले आहे. ४० महिलांनी याचे नियोजन केले. मंदिरालगत पिंपळ व अशोकाच्या झाडावर असंख्य वटवाघळांचे वास्तव्य आहे. पहाटे चारच्या सुमारास त्यांचा आवाज सुरू झाल्यानंतर ग्रामस्थ उठतात आणि दिनक्रम सुरू करतात.**

### गुढीपाडवा, महाशिवरात्रीला उत्सव

**मंदिराची यात्रा गुढीपाडव्याला दोन दिवस असते. जुन्या काळात काळात अष्टधातूंपासून बनविलेल्या रामलिंगेश्वर यांची मूर्ती वर्षातून एकाचवेळी गुढीपाडव्याच्या यात्रेनिमित्ताने मंदिरात ठेवली जाते. पुन्हा मूर्ती वर्षभर बाबासाहेब शिवाप्पा बिराजदार यांच्या घरी असते. पूर्वीच्या काळी संरक्षणासाठी म्हणून मंदिरात मूर्ती कायम स्वरूपी ठेवण्याची प्रथा नसावी. महाशिवरात्रीला मंदिरात विविध कार्यक्रम असतात. तीन दिवस शिवलीला अमृत पारायण असते. दरम्यान, श्रावणमासानिमित्त दररोज श्रींच्या मूर्तीला रुद्राभिषेक करण्यात येतो. सायंकाळी शिवभजनाचा कार्यक्रमही घेण्यात येतो, अशी माहिती पुजारी मल्लिनाथ स्वामी यांनी दिली.**



# लोकमंगल कृषी महाविद्यालयतर्फे जीवाणू गती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा मार्फत दिनांक ३० जुलै रोजी जिवाणू खत निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते सदरील कार्यशाळेस उत्तुर, वडकबाळ, राजूर ,होटगी होटगी स्टेशन, फोन मुर्गी, या गावातील शेतकऱ्यांना निमंत्रित करण्यात आले होते. कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून लोकमगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अमोल शिंदे हे लाभले. रानम असली गावची जैविक खतादरीत शेती करणारी प्रगतशील शेतकरी श्री सुधाकर शिरसाट हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते




कार्यशाळेचे प्रास्ताविक वनस्पती विकृतीशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्राध्यापक किरण माळी यांनी मांडले प्रास्ताखी मध्ये जिवाणू खते निर्मिती कार्यशाळा आयोजना मागची महाविद्यालयाची भूमिका त्यांनी विशद केली व कार्यशाळेची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली व कार्यक्रमास लाभलेले प्रमुख अतिथी डॉक्टर सुधाकर शिरसाठ यांची स्वागत व प्राचार्य डॉक्टर अमोल शिंदे यांनी पुष्पक्ष देऊन केले व कृषी कन्याकुमारी अर्पिता विजापूरे यांनी महाविद्यालयात कारवीत असणारे जिवाणू खताची निर्मिती प्रकल्प आणि उत्पादनाबाबत सखोल सादरीकरण चलचित्र भीतीच्या माध्यमातून सादर केले व सादरीकरणांमध्ये महाविद्यालय जिवाणू खते निर्मितीसाठी उपलब्ध असलेली यंत्रणा व पीएसबी केएसबी आणि ट्रायकोडर्मा या उत्पादनाचे तांत्रिक पद्धती इत्यादी सर्व बाबी विस्तृत पद्धतीने मांडण्यात आल्या वय कार्यक्रमाला लाभलेली प्रमुख अतिथी श्री सुधाकर शिरसाट यांनी शेतकऱ्यांना संबोधित करताना त्यांचा भाजीपाला पिकाच जैविक खताच्या वापराची प्रभावी परिणाम आणि फायदे याबाबत मार्गदर्शन केले व कार्यशाळेचे आयोजनाबाबत मौजे होडगी येथील शेतकरी गोविंदराव पाटील आणि महाविद्यालयाचे विशेष आभार व्यक्त केली व कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून डॉक्टर अमोल शिंदे यांनी उपस्थित शेतकऱ्यांचे मनस्वी आभार व्यक्त केली व महाविद्यालयाने लोकमंगल समोरचे नेहमी शेतकऱ्यामार्फत नवनवीन तंत्रज्ञान अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून पोहोचवण्यासाठी नियमित स्वरूपात कार्य करेल अशी ग्वाही दिली व कार्यशाळेच्या औपचारिक उद्घाटनाची सूत्रसंचालन कुमारी वैष्णवी जाधव तर आभार प्रदर्शन प्रतीक नांगरे यांनी केले व औपचारिक कार्यक्रमानंतर शेतकऱ्यांनी महाविद्यालयाच्या जैविक खते निर्मिती प्रकल्पात सदिच्छा भेट दिली व कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले व कार्यशाळेची यशस्वी आयोजन व संपन्नतेसाठी प्राध्यापक किरण माळी कृषी विस्तार विभाग प्रमुख प्राध्यापक प्रज्ञा गोंधळे आणि अंतिम वर्षातील रावे मॉडेलच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले व कार्यशाळेत एकूण ५५ शेतकरी अंतिम वर्षातील विद्यार्थी विद्यार्थिनी आणि सर्व प्राध्यापक वृंदायांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

# कालकथित रेश्मा भगवान गोतसुर्वे स्मृतीदिनी आचेगांव येथे वृक्षारोपणसह विविध उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/आचेगांव : माजी तंटामुक्त अध्यक्ष सोसायटी संचालक भगवान गोतसुर्वे यांच्या सुविध्य पत्नी स्मृतीशेष रेश्मा भगवान गोतसुर्वे यांच्या प्रथम पुण्यस्मरणदिनानिमित्त आचेगांव ता. दक्षिण सोलापूर या ठिकाणी विविध ठिकाणी ट्री गार्ड (जाळी )लावून वृक्षारोपण करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

सर्व प्रथम श्री शावरसिद्ध प्रशाला येथे त्यांची मुले सौमित व कुंजल यांच्या वतीने श्री शावरसिद्ध प्रशालेचे मुख्याध्यापक इब्राहिम बिराजदार व अशोक पाटील यांच्या 'एक पेड मेरे माँ के नाम' म्हणून झाडे लावण्यात आली, त्याच बरोबर साने गुरुजी मागासवर्गीय वसतिगृह, बौद्ध स्मशानभूमी व तका समाजमंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी बलवान गोतसुर्वे यांनी मोठयाप्रमाणात नुसते झाडे लावणे इतकेच संकल्प नसून कमी प्रमाणात वृक्ष लावून त्यास संवरक्षक म्हणून लोखंडी जाळी (ट्री गार्ड ) झाडे जास्त प्रमाणात झाडे जगवणे हा उद्देश असल्याचे सांगितले.



यावेळी स्मृतीशेष -रेश्मा भगवान गोतसुर्वे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त आचेगांव श्री शावरसिद्ध प्रशाला, सानेगुरुजी वसतिगृह, बौद्ध स्मशानभूमी व तका परिसर येथे वृक्षारोपण करण्यात आले. सर्व प्रथम प्रतिमा पूजन व सायंकाळी पुण्यस्मरण विधी करण वाघमारे यांनी पार पाडली.

वृक्षारोपण व पुण्यस्मरण विधी प्रसंगी मुख्याध्यापक इब्राईम बिराजदार, अशोक पाटील, विकास सुर्वे भगवान गोतसुर्वे, बनसिद्ध गुरव, बलवान गोतसुर्वे, अनिल पाटील, संजय गोतसुर्वे, मारुती गोतसुर्वे, दर्शन गोतसुर्वे, मनोज गोतसुर्वे, जितेंद्र गोतसुर्वे, भारत सोनकांबळे,पांडुरंग सुर्वे,विशाल सुर्वे, जयंती अध्यक्ष राम गोतसुर्वे, अरुण थोरात, इस्माईल शेख, करण गजधाने, संघर्ष शिंदे, सनी देवरे, धनंजय गायकवाड, विजय वाघमारे, सुधाकर गोतसुर्वे, शिवाजी गोतसुर्वे, अभिषक गोतसुर्वे, सौमित गोतसुर्वे खाजेंद्र भणजे, निरंजन गोतसुर्वे आदिसह सर्व नातेवाईक,श्री शावरसिद्ध प्रशाला शिक्षक व कर्मचारी, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव पदाधिकारी व गावकरी उपस्थित होते. रात्री अमरभीम गायन पार्टी वतीने श्रद्धांजलीपर गीत गायन करण्यात आले.

# कुंभिटोला प्राथमिक आरोग्य केंद्राची गप्पीमासे मोहीम

प्रतिनिधी/बाराभाटी : स्थानिक ठिकाणच्या साचलेल्या पाण्यामधून गप्पीमासे पकडणे मोहीम कुंभिटोला–बाराभाटी येथील आरोग्य उपकेंद्र विभागातील कर्मचारी यांनी सुरू केली आहे.

मलेरिया अशा साथीच्या रोगापासून नागरिक कोसोदूर राहून नागरिकांचे आरोग्य सुदृढ रहावे म्हणून परिसरातील आरोग्य कर्मचारी हे गप्पीमासे मोहीम गेल्या महिना भरापासून चालत आहेत. यामध्ये कुंभिटोला, येरंडी, बाराभाटी, ब्राम्हणटोला, चापटी, बोळदे कवठा आदी गावातील साचलेल्या पाण्यातील गप्पीमासे पकडणे मोहीम हाती घेतली



आहे. मलेरिया साथीचा रोग आहे. याचे परिणाम संसर्गजन्य आजार आहे. याचे जिवाणू सततच्या सहवासातून पसरण्याची शक्यता आहे. करिता मोहीम महत्त्वाची आहे. यामध्ये आरोग्य सेवक राजेश वघारे, कु. वाय. पी. मानापुरे हे करीत आहेत.

# पी. एम. किसान सन्मान निधीचा मच्छीमारांना लाभ मिळवून देणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मत्स्यशेतीला महाराष्ट्र राज्य सरकारने कृषीचा दर्जा दिला आहे.त्याप्रमाणे भारत सरकारने ही मत्स्यशेतीला कृषीचा दर्जा द्यावा यासाठी आपण केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांची भेट घेणार आहोत.मत्स्यशेतीला केंद्र सरकार ने कृषीचा दर्जा दिल्यास पी एम किसान सन्मान निधीचा लाभ मच्छीमारांना मिळवून देता येईल.त्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी दिले.

पी एस किसान सन्मान निधी च्या २० व्या हफ्त्याचा वितरण सोहळा मुंबईत वर्सोवा येथील केंद्रीय मत्स्य शेती संस्थेच्या सभागृहात आयोजक करण्यात आला होता. यावेळी दृकश्राव्य माध्यमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाराणसी येथून देशभरात शेतकऱ्यांना पी एम किसान सन्मान निधीच्या २०व्या हफ्त्याचे वितरण करण्यात आले.

वर्सोवा येथील केंद्रीय मत्स्य शिक्षण संस्थेच्या सभागृहात आयोजित पी एम किसान सन्मान निधी वितरण कार्यक्रमात मुंबईतील मरोळ आणि वर्सोवा येथिल मच्छीमार संघटनेच्या प्रतिनिधींनी पी एम किसान सन्मान निधी चा लाभ मच्छीमारांना मिळवून देण्याच्या मागणीचे निवेदन केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांना दिले.त्यावेळी आपण मत्स्यशेतीला कृषीचा दर्जा देऊन मच्छीमारांना पी एम किसान सन्मान निधीचा लाभ मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन ना. रामदास आठवले यांनी दिले.यावेळी मच्छीमारांना उपयुक्त वस्तूंचे वाटप ना. रामदास आठवले यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच केंद्रीय मत्स्य शिक्षण संस्थेच्या स्मरणिकेचे प्रकाशन न.रामदास आठवले यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी केंद्रीय मत्स्य शिक्षण संस्थेचे देवजीत शर्मा; डॉ स्वदेश प्रकाश; अर्पिता शर्मा; संजय बुकोलिया आदी मान्यवर तसेच मच्छीमार संघटनेच्या अध्यक्षा राजश्री भानजी; राजेश नाखवा आदी मान्यवर उपस्थित होते.

### मत्स्यशेतीला भारत सरकारने कृषीचा दर्जा देण्याच्या मागणीचे मच्छीमारांनी दिले केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना निवेदन

# कृषि तंत्र विद्यालय खानिवली येथे ज्वेलरी पॉलिशिंग अँड किल्निंग आणि मोती शेतीची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

मोती शेती प्रशिक्षण भारतासह जगभरात मोत्यांना मोठी मागणी आहे. त्याकडे एक आलिशान दागिने म्हणून पाहिले जाते. महिलांना मोत्यांची एक वेगळीच क्रेझ असते. मोती हे एक नैसर्गिक रत्न आहे जे शिंपल्यापासून तयार केले जाते.



मोती शेतीची लोकप्रियता वाढली आहे आणि आता त्याची लागवड शेतकऱ्यांसाठी उत्पन्न आणि रोजगाराचा एक प्रमुख स्रोत बनत आहे. याच अनुषंगाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे, कृषी पुरक व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी व कौशल्ययुक्त कृषि उद्योजक तयार करण्याच्या उद्देशातून कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक युवतींना व्हावा, या दृष्टीकोनातून महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करुन महाविद्यालयीन युवक युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने भिवंडी तालुक्यातील कृषि तंत्र विद्यालय खानिवली येथे रूची सामाजिक संस्थेच्या माध्यमातून आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ची स्थापना करण्यात करण्यात आली असून ज्वेलरी पॉलिशिंग अँड किल्निंग (ऋष्णी रपव क्षरुशश्रश्ररी ्रिळीहशी ) असा कोर्स सुरु करण्यात आला आहे. यावेळी दिनांक १ ते २ ऑगस्ट २०२५ रोजी ज्वेलरी पॉलिशिंग अँड किल्निंग या कोर्सच्या माध्यमातून मोती शेती कशी केली जाते, शिंपल्यांची निवड, मोती संवर्धन प्रक्रिया, पाण्याची गुणवत्ता व्यवस्थापन, मोती शेतीचे फायदे, मोती शेतीसाठी लागणारी साधने,तसेच मोती पासून दागिने कसे बनविले जातात. मोत्याच्या दागिन्यांना कशाप्रकारे मागणी आहे. त्यापासुन किती उपन्न होतो. याबाबत वैज्ञानिक अशोक मनवाणी, कुलंजन मनवाणी मानवांनी, रुची सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा वंदना लोखंडे यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. तर मोती शेती संदर्भात प्रात्यक्षिकेत दाखवण्यात आली. सदर कोर्स पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शासनाकडून प्रमाणात देण्यात येणार आहे. यावेळी मोती शेती प्रशिक्षणामध्ये कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य मिलिंद घरत, उपप्राचार्य जितेंद्र खरे , प्रोजेक्ट मॅनेजर गौरव उपाध्यय, स्कील कॉर्डिनेटर मिलिंद जाधव, ज्वेलरी टीचर्स स्वाती ठाकरे तर विद्यार्थी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# बहुजनांना सर्वांगीण विकासाठी शिक्षणा शिवाय पर्याय नाही

## दयानंद काळुंके; शिका! संघटीत व्हा! संघर्ष करा!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून प्रेरणा घेवून आपला सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षणा शिवाय दुसरा पर्यायचं नाही. तेंव्हा शिका! संघटीत व्हा! संघर्ष करा! हा भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी दिलेला मुलमंत्र आत्मसात करून बहुजना- तील तरुणांनी परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षण घेवून आपला पर्यायाने समाजाचा सर्वांगीण विकास साधावा असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा जिल्हा बालकण्यान समितीचे सदस्य दयानंद काळूंके ( अणदूर ) यानी वागदरी ता.तुळजापूर येथे आयोजित. कार्यक्रमात बोलताना केले.

साहित्य सम्राट लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे जयंती उत्सव मंडळ वागदरी च्या वतीने साहित्य रत्न अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त- ाने आभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी दयानंद काळुंके प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी मिटकर गुरुजी हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून भालचंद्र यादव, तंटा मुक्त समितीचे अध्यक्ष राजकुमार पवार, उपाध्यक्ष मदनराजे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार ) चे युवा नेते अमोल पाटील, आदी उप- स्थित होते

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,व साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करून आभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी अमोल पाटील, रामचंद्र लोंढे, शिवाजी मिटकर गुरुजी आदीची ही मार्गदशीनपर भाषणे झाली. यावेळी शालेय विद्यार्थांची ही भाषणे झाली.

याप्रसंगी रामचंद्र यादव, महदेव बिराजदार, रामसिंग परिहार, अमोलसिंग परिहार, भाजपाचे तालूका उपाध्यक्ष किशोर सुरवसे, भाजपा मिडीयाविभाग तालूका प्रमुख तथा संयोजक किशार धुमाळ, संजय काकडे ग्रा.प. सदस्य अमोल पवार,सेवा निवृत्त पोलीस हव- ालदार संदिपान वाघमारे, पीलीस पाटील बाबुराव बिराजदार, अनिल वाघमारे, रिपाइं (आठवले गट ) तालुका संघटक सुरेश लोंढे, शाखा अध्यक्ष . देवानंद लोढे,डॉ. सुरज लोंढे, सह महिला,ग्राम स्थ,युवा कार्यकर्ते मोठ्य संख्येने उप- स्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव एस.के. गायकवाड यानी केले तर अभारप्रदर्शन जयंती उत्सव कमिटीचे बाळू कांबळे यानी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती उत्सव कमिटीचे बाळू भंडारे, दत्ता कांबळे, आप्पा भंडारे, कृष्णा कांबळे,सुर्यकांत वाघमारे, अण्णासाहेब वाघमारे, रमेश वाघमारे, सहादेव वाघमारे सह कार्यकर्त्यानी परिश्रम घेतले.

# शेडोळ आत्माराम महाराज संजीवन समाधी सोहळ्याला सुरुवात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव : श्री संत श्रेष्ठ गुरुवर्य आत्माराम महाराज समाधी संजीवन सोहळ्या निमीत्त शेडोळ येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात झाली असुन आज गावात मानाची दिडी काडत मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ पुजन व आरतीने सप्ताहाला प्रारंभ करण्यात आला ...

निलंगा तालुक्यातील शेडोळ येथील अखंड हरिनाम सप्ताहात सात दिवस .काकडा. ज्ञानेश्वरी पारायण .गाथा भजन .भागवत कथा.हरिपाठासह भाविकासाठी सुश्राव्य किर्तनाचे आयोजन करण्यात येते.

शेडोळ गावात प्रतिपंढरपुर प्रमाने भाविकांची गर्दी होत असते. व सर्वधर्म समभाव जपत ह.भ.प माधव महाराज ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या कित्येक वर्षापासुन पारंपारीक अखंड हरिनाम सप्ताह सुरु आहे.

यावेळी ,ह.भ.प माधव महाराज ढाकणे आळंदी देवाची ,ह.भ.प श्रीनिवास राउत गुरुजी,.जिल्हा परीषद माजी अध्यक्ष पंडीतराव धुमाळ .शेडोळ नगरीचे कर्तव्यदक्ष आदर्श सरपंच स्वरुप धुमाळ ,उपसरपंच विशाल भैया धुमाळ ,तंटामुक्ती अध्यक्ष शंकर धुमाळ , माजी सरपंच बस्वराज स्वामी .माजी उपसरपंच विकास पाटील प्रा ,सतिश धुमाळ ,वारकरी साहित्य परीषद चे जिल्हाध्यक्ष ह.भ.प श्रीधर धुम ाळ .ड वैभव धुमाळ ,शिवाजी बापु धुमाळ .दिलीप स्वामी ,भाउसाहेब धुमाळ ,शिवाजी बब्रुवान धुमाळ ,गुणवंत जाधव ,शामराव धुमाळ ,युवराज कदम ,शाहुराज धुमाळ .सह शेडोळ गावातील ग्रामस्थ व भजनी मंडळाचे सदस्य उपस्थीत होते

# महसूल सप्ताह निमित्त पंढरपूर तालुक्यात वृक्षारोपण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : महसूल सप्ताह निमित्त दिनांक ३ ऑगस्ट रोजी पंढरपूर तालुक्यात तहसीलदार सचिन लंगुटे , गटविकास अधिकारी सुशील संसारे यांच्या हस्ते पाणंद रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली.

यावेळी लोणारवाडीचे मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, माजी सरपंच व ग्रामस्थ, ग्रामरोजगार सेवक, नरेगा तांत्रिक अधिकारी, अव्वल कारकून ग्रामस्थ उपस्थित होते. वृक्ष रोपण केल्यानंतर त्या रोपांचे संगोपन करण्याच्या सूचना तहसीलदार लंगुटे व गटविकास अधिकारी संसारे यांनी दिल्या. तसेच करकंब, भोसे, जळोली, रांजणी येथे सरपंच, मंडळ अधिकारी, तलाठी, कृषी सहाय्यक ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक व ग्रामस्थ यांच्या हस्ते महसूल सप्ताह निमित्त तहसीलदार यांच्या सूचनेनुसार पांनंद रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली.

# येडोळा व वागदरी येथे वर्षावास निमित्ताने कार्यक्रम संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाडः तुळजापूर तालूक्यातील मौजे येडोळा व वागदरी येथे वर्षवास निमित्ताने सामुदायिक बुद्ध वंदना व धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. .

येडोळा येथील आंबेडकर भवनमध्ये सिद्धार्थ बुद्ध विहार कमिटी व भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने वर्षावास निमित्ताने बुद्ध वंदना व धम्मदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ कार्यकर्त कैलास गवळी गुरूजी हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून भारतीय बौद्ध महासभेच्या धाराशिव जिल्हा अध्यक्षा राजश्रीताई कदम, जिल्हा उपाध्यक्ष विश्वास पांडगळे, तालुका सरचिटणीस राकेश जेटिथोर, बौद्वाचार्य तथा केंद्रीय शिक्षक बाळासाहेब बागडे गुरूजी आदी होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून बुद्ध वंदना व भीम स्तुती घेऊन अभिवादन करण्यात आले यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा अध्यक्षा राजश्री कदम यांनी धम्म चळवळ गतिमान करण्यासाठी आपन सर्वांनी बौद्ध धम्माचे अतिशय प्रभावीपने तंतोतंत पालन केले पाहिजे असे मत मांडले तर विश्वास भाऊ पांडगळे व बाळासाहेब बागडे गुरूजी यांनी बौद्ध धम्मात वर्षभरात येणाऱ्या सर्व पौर्णिम ांचे महत्व पटवून दिले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्र संचालन अमर जेटीथोर यांनी केले.यावेळी रमाई महिला मंडळाच्या सविता लोंढे सुनीता लोंढे सुवर्णा लोंढे उषा लोंढे महादेवी लोंढे साळुं लोंढे रागिणी लोंढे रतन लोंढे शितल लोंढे छबूबाई लोंढे सुनीता वाघमारे उषा गायकवाड नागरबाई जेटिथोर मैना कांबळे,करुणा लोंढे पार्वतीबाई लोंढे स्नेहा लोंढे सह सिद्धार्थ बुद्ध विहार कमिटी तसेच सिद्धार्थ क्रीडा व युवक मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते या प्रसंगी विश्वास पांडगळे सरानी बुद्ध आणि त्यांचा धम्म हा ग्रंथ मंडळास भेट दिला. तसेच पंचशिल बुद्ध विहार कमिटी वागदरी व भारतिय बौद्ध महासभा जिल्हा शाखा धाराशिव यांच्या संयुक्त विद्यामाने वागदरी ता.तुळजापूर येथेही वर्षावास निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी माजी उपसरपंच मुक्ताबाई वाघमारे व भारतिय बौद्ध महासभेच्या जिल्हा अध्यक्षा राज- श्रीताई कदम यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतिय बौद्ध महासभेचे बाळासाहेब बागडे गुरुजी यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले.

या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे विश्वास भाऊ पांडागळे, राकेश जेरीथोर,कैलास गवळी गुरुजी, पंचशिल बुद्ध विहार समिती वागदरीचे सचिव एस.के. गायकवाड, सुर्यकांत वाघमारे, श्रीदेवी वाघमारे,कविता गायकवा, गिताबाई झेंडरे, उज्वला वाघमारे,कविता संदिपान वाघमारे, कमल धाडवे, ठकूबाई वाघमारे,सह शालेय विद्यार्थी आ- पस्थित होते.

# वै. श्रीमती भिमाबाई सखाराम कापसे यांची आज दशक्रिया विधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्रीमती भिमाबाई सखाराम कापसे, मुळगाव राहता तालुका कोपरगाव जिल्हा अहमदनगर ही वैकुंठवासी झाले आहेत त्यांच्या हाती तुळशी माळा घालून अनुग्रह घेतला होता गेले चार वर्षे चाळीस वर्षापासून राम कृष्ण हरी मंत्र संस्था



उंच विठोबा सांगोला रोड भक्तनिवाससमोर असलेल्या मठात मोठ राखण्याचे काम करीत होत्या व अतिशय निष्क्रुपणे व निरप- क्षपणे तिने बाबांची सेवा केली व बाबा पंढरपूरला आल्यानंतर त्यांची जेवण काय राहण्याची व्यवस्था व इतर वेळी मठाचे राखण करत होत्या.

१९६२ पासून तेथे बाबांची झोपडी बांधून तिथे ठेवली होती त्यानंतर इमारत झाली तेव्हा तिला स्वतंत्र खोली दिली राहते की असून सखे नातेवाईक मरण पावले तरी ते राहत्याला गेली नाही इतकीच तिची बाबा व मठावर श्रद्धा घडले होते तिचे वय ८७ वर्षे झाले आहे हाडे ठिसूळ झाली होती त्यामुळे उठता येत नव्हते दिनांक २६ जुलै २०२५ रोजी मठात निधन झाले पंढरपूर वैकुंठ भूमी त्यांचा अंत्यविधी करण्यात आला.

# परसबाग निर्मिती स्पर्धेत कसगी येथील सिद्धेश्वर विद्यालय तालुक्यात प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : उमरगा गटशिक्षणाधिकारी कार्यालयच्या वतीने तालुक्यातील मुख्यमंत्री आदर्श शाळा, परसबाग निर्मिती स्पर्धा, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक, शाळा आणि संस्था, त्यांचा गौरव सोहळा कार्यक्रमाचे प्रमुख उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्र शासना तर्फे प्रधानमंत्री पोषण आहार योजनेअंतर्गत शाळा तेथे परसबाग निर्मिती निर्मिती स्पर्धा राबवून, शाळेतील पोषण आ- हारामध्ये मुबलक प्रमाणात भाजीप- ाला उपलब्ध व्हावा. कुपोषण अन्न, रुचकर व पौष्टिक व्हावे म्हणून, उत्कृष्ट परस्पर स्पर्धा सन २०२४ (दुसरा टप्पा) राबवण्यात आले होते.

यात तालुका आणि जिल्हा स्तरा- वर

प्रथम द्वितीय तृतीय आणि उत्त- ेजनार्थ दोन शाळा पुरस्कृत करण्यात येतो.




या स्पर्धेत महाराष्ट्र कर्नाटक टोकाच्या शेवटचे गाव असलेले कसगी श्री सिद्धेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी त्यांनी प्रथम क्रमांकाचे पुरस्कार प्राप्त केले आहे.

सदर परस्पर निर्मितीमध्ये, लोकसहभाग, विद्यार्थी सहभाग, परसबागेची रचना, विविध देशी वाण, गांडूळ खत प्रकल्प, मायक्रो ग्रीन, पाण्याचे तुषार सिंचन व्यवस्थापन, करून सव्वा एकर क्षेत्रावरती विविध ४० प्रकारच्या फळभाज्या आणि पालेभाज्या लागवड करण्यात आले होते. त्या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांनी सहभाग नोंदवला होता.

त्यात प्रथम क्रमांक श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी, द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद प्रशाला उमरगा, तृतीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लता तांडा मुळज या शाळेने पुरस्कार मिळवला. आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते या शाळांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, बीटचे केंद्रप्रमुख विस्तार अधिकारी सर्वसाधारण व्यक्ती, विविध शाळ- ेचे पुरस्कार प्राप्त विद्यालयाचे मुख्याध्यापक,शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार शीला मुदगडे यांनी मानले

**सोलापूर जिल्हा ग्रामीण परमिट रूम बार असोसिएशनचे जिल्हाध्यक्षपदी सुभाष भोसले यांची निवड**

**पंढरपूर येथे पार पडली बैठक**

# परमिट रूम बार चालकांवरील अन्याय रोखण्यासाठी एकत्र लढा उभारण्याचा निर्धार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर येथे सोलापूर जिल्हा ग्राम ीण परमिट रूम बार असोसिएशनची बैठक येथील सदुरु मंगल कार्यालय येथे पार पडली. या बैठकीसाठी सोलापूर जिल्ह्यातील परमिट रूम बार चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीच्या आयोजन परमिट रूम बार असोसिएशनची पंढरपूर तालुका अध्यक्ष सुरज भोसले, भैय्यासाहेब महाडिक यांच्या वतीने करण्यात आले होते.




यावेळी सोलापूर ग्रामीण परमिट रूम बार असोसिएशनच्या जिल्हाध्यक्षपदी सुभाष भोसले यांची सर्वांमध्ये निवड करण्यात आली.

या बैठकीत व्हॅट संपूर्ण माफ करण्यात यावा जिल्ह्यातील अवैद्य व्यवसाय बंद करण्यात यावा व दरवर्षी होणारी लायसन व्यवहार थांबवण्यात यावी, व बिअर बार प्रमाणे देशी म ध्य विक्री करण्यास परमिट रूम बार चालकांना परवानगी देण्यात यावी, व मागण्या बैठकीत करण्यात आलेल्या याबाबत राज्य सरकारकडून सकारात्म क निर्णय न झाल्यास लायसन्स रिन्यूअल करणार नसल्याचा इशारा सोलापूर जिल्हा परमिट रूम बार्शी च्या वतीने देण्यात आला.

याप्रसंगी ढाबे व इतर ठिकाणी कोणतेही कर न न भरता एम आर पी प्रमाणे वैदरीत्या दारू विक्री केली जात आहे मात्र परमिट रूम बार चालकांना मोठ्या प्रमाणावर कर आकारला जात असल्याने सरकारच्या या करवड धोरणामुळे परमिट रूम बार व्यवसाय धोक्यात आल्याने परमिट रूम बार चालकांवर होणारा अन्याय रोखण्यासाठी असोसिएशनच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांकडून एकत्र लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

लवकरच वरील मागण्याचे निवेदन उपमुख्यमंत्री तथा उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार उत्पादन शुल्क कमिशनर मुंबई जिल्हाधिकारी सोलापूर जिल्हा पोलीस अधीक्षक उत्पादक शुल्क विभाग पोलीस अध- ीक्षक सोलापूर ग्रामीण, त्याचबरोबर पंढरपूर येथील उत्पादन शुल्क कार्यालय निवेदन देण्यात येणार असल्याची नूतन जिल्हाध्यक्ष सुभाष भोसले यांनी यावेळी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर संघटनेचे महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष कैलास गौंड, सोलापूर शहराध्यक्ष इंदापूर महाराष्ट्र मध्ये विक्री संघटनेची सा- तारा कार्याध्यक्ष सचिन बेलगोंडे, संजय पाटील टेंभुर्णी सचिन सेहगल, काकासाहेब जगदाळे माळशिरस माळशिरस, अभिजीत राऊत बार्शी, आकाश लोंढे माढा, संजय शिरसा- गर मोहोळ, कैलास फंड करमाळा, सतीश कोंडभैरी मंगळवेढा, सय्यद शेख सांगोला, गणेशारी वैराग, रा- हुल देशमुख वेळापूर, पंढरपूर तालुका सचिव सतीश भोसले उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका उपाध्यक्ष दयानंद बाबर यांनी केले तर आभार तालुकाध्यक्ष सुरज भोसले यांनी मानले.

# राज्य शासन एसटी महामंडळ आणि एसटी कामगारांच्या पाठिशी खंबीरपणे उभे : उपमुख्यमंत्री अजित पवार

## राज्यातील सर्व जिल्ह्याच्या ठिकाणची स्थानके बस पोर्टल म्हणून विकसित होणे गरजेचे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : एसटी महामंडळ आणि एसटी कामगारांचे मूलभूत प्रश्न मार्गी लागले पाहिजेत अशी राज्य शासनाची भूमिका असून राज्य शासन एसटी कामगारांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे महासचिव हनुमंत ताटे यांचा अमृतमहोत्सव सोहळा व त्यानिमित्त आयोजित कामगार परिषदेत ते बोलत होते. हडपसर येथील विठ्ठल तुपे नाट्यगृहात आयोजित या कार्यक्रमास उद्योगमंत्री उदय सामंत, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार चेतन तुपे, बापूसाहेब पठारे, ज्येष्ठ काम गार नेते बाबा आढाव, माजी आम दार रवींद्र धंगेकर, सुनील टिंगरे, म्हाडाचे माजी उपाध्यक्ष विजय कोलते, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, कोरोना कालावधीत एसटी कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्न होता. तेव्हा राज्य शासनाने पुढाकार घेऊन वेतनाची आवश्यक ती तरतूद केली होती. राज्य शासन एसटी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या अडचणीच्या काळात मागे उभे राहते. सन १९४८ पासून एसटीचा प्रवास सुरू झाला असून 'गाव तेथे एसटी' या ब्रीदवाक्यानुसार सर्वसामान्य माणसाला प्रवासाची सेवा देत आहे. सेवा देत असताना एसटी लोकाभिमुख झाली पाहिजे. प्रवाशांनाही परवडणाऱ्या दरात सेवा देणे आवश्यक असून त्याबाबत कामगारांनीही पुढाकार घेतला पाहिजे. राज्यातील शहरांचा विस्तार झाल्यामुळे एसटीच्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जागा शहराच्या मध्यवर्ती भागात



आल्या आहेत. त्या ठिकाणी एसटी स्थानकांचा सार्वजनिक खा-सगी भागीदारी तत्त्वावर (पीपीपी) विकास करण्यासाठी कराराचा कालावधी ३०-३०-३० वर्षे असा वाढविण्याचे धोरण अंमलात आहे. तथापि, कमी कालावधीमुळे विकासक पुढे येत नसल्याने आता यात बदल करुन आधी ४९ व नंतर ४९ वर्षे असा ९८ वर्षापर्यंत करार वाढविण्याचे नवीन धोरण लवकरच राज्य शासन आणत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना चांगल्या मूलभूत सोयी सुविधा मिळतील, असेही ते म्हणाले.

सर्वसामान्यांना सेवा पुरवित असलेल्या एसटी बसेस चांगल्या असल्या पाहिजेत ही शासनाची भूमिका आहे. डिझेल इंधनावरील खर्च वाचविण्यासाठी ईलेक्ट्रिक बसेस-लाही (ईव्ही) प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. त्यासाठी केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात अनुदान देत असून राज्य शासनही प्रयत्न करत आहे, अस-ेही ते म्हणाले. कामगार संघटनेचे महासचिव हनुमंत ताटे यांनी इंदापूर तालुक्यातील एका सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येऊन एसटीत कारकुनाची नोकरी पत्करल्यानंतर कामगारांच्या प्रश्नांसाठी संघटनेत प्रवेश केला आणि डेपो सचिव, विभाग सचिव, प्रादेशिक उपाध्यक्ष ते महासचिव या पदापर्यंत मोठी वाटचाल केली. महामंडळावर दोन वेळा कामगार प्रतिनिधी म्हणून काम केले. त्यांनी काम गारांच्या प्रश्नांसाठी सतत पुढाकार घेतला, अशा शब्दात उपमुख्यमंत्री पवार यांनी त्यांचा गौरव केला.

उद्योगमंत्री सामंत म्हणाले, एसटी म हामंडळाचे कर्मचारी मागण्यांसाठी संप करतात तेव्हा ते प्रवाशांचाही विचार करतात. पाच वर्षापूर्वी त्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने राज्यशासनाने सकारात्मक निर्णय घेऊन ६ हजार ५०० रुपयांची वाढ केली. कामगारांना देशात सर्वाधिक वेतन देणारे आपले एसटी महामंडळ आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने एसटी स्थानकांच्या विकासासाठी ६०० कोटी रुपये दिले असून त्यातून विविध थांब्यांचा विकास करण्यात येत आहे. राज्यातील सर्व जिल्ह्याच्या ठिकाणची स्थानके बस पोर्टल म्हणून विकसित होणे गरजेचे आहे. स्थानकांवर चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी एसटी कामगार आग्रही असले पाहिजेत, असेही ते म्हणाले. यावेळी ताटे आणि त्यांच्या पत्नी यांचा उपमुख्यमंत्री, उद्योगमंत्री यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. ताटे यांनी सन्मानाला उत्तरपर भाषण दिले. कामगार नेते बाबा आढाव यांनीही मनोगत व्यक्त केले. संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे पदाधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

### थोडक्यात...



### ाबुराव विणकर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल एक्सलन्सी सर्व्हिस अवॉर्ड पुरस्काने सन्मानित

नवी दिल्ली येथे २ अगस्त ला ग्लोबल ह्युमन राईट्स प्रोटेक्शन फोरमच्या वतीने श्री .बाबुराव भगवान विणकर यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल एक्सलन्सी सर्व्हिस अवॉर्ड या पुरस्काने सन्मानित करण्यात आले. विशेष गर्वाची बाब म्हणजे सन २०२५ मध्ये देशात देण्यात आलेला हा एकमेव एक्सलन्सी सर्व्हिस अवॉर्ड आहे जो देशात महाराष्ट्र राज्याचे श्री .बाबुराव विणकर यांना देण्यात आला आहे.


पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह .प्रमाणपत्र व असामी शाल देऊन करण्यात अला आहे त्यांचे सामाजिक . शैक्षणिक व मानव कल्याणासाठी चे कार्य पाहता GHRPF च्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला तर अन्य राज्य मध्ये १५ .डॉ बाबासाहेब आंबेडकर नॅशनल अवॉर्ड देण्यात आले आहे.यामधे. नेपाळ. दिल्ली .पाच्शिम बंगाल.उतरखंड. आसाम. अरुणाचल प्रदेश महाराष्ट्र .उत्तर प्रदेश. कर्नाटक अश्या विविध राज्यातून पुरस्कार विजेते उस्थित होते.

बाबूराव विणकर यांची नेपाळ मधील GHRPF च्या डॉ.सुनीता शाह ने रुद्राक्ष मालां ने नेपाळी प्रम्पपरेणे स्वागत केले तर या कार्यक्रमाचे .मुख्य मार्गदर्शक म्हणून ग्लोबल ह्युमन राईट्स प्रोटेक्शन फोरमचे फाउंडर श्री .महानंदा सरकार दत्त.आणि ॠख्ठझॠ चें राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष डॉ कांशीराम पैठणे.डॉ नुना हजारिका.डॉ. जयपाल.डॉ बबनराव महामुने तसेच अन्य मान्यवर उस्थीत होते तर कार्यक्रमाचे सुरेख असे सूत्र संचालन डॉ. ऍड. विधीतज्ञ विजयकुमार कस्तुरे साहेबांनी केले

## स्वेरीच्या दोन विद्यार्थ्यांची 'क्युनोपी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीत निवड







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/ पंढरपूर : 'क्युनोपी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या दोन विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली. कॉम्प्युटर क्षेत्राशी संबंधीत पुणे येथील 'क्युनोपी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीच्या निवड समितीने स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगम धील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फ ेरीतून धनश्री यशवंत बागल व विशाल बंडू गडदे या दोन विद्यार्थ्यांची निवड केली. या नामांकित मल्टीनॅशनल कंपनीत सिलेक्शन झालेल्या दोनही विद्यार्थ्यांचे वार्षिक पॅकेज प्रत्येकी रु. ४.५ लाख इतके आहे. स्वेरी मध्ये नवनवीन आंतरराष्ट्रीय कंपन्या येत असतात आणि त्यातूनच कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आ-पले उत्तम करिअर घडवीत आहेत. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. ए.ए.मोटे, डॉ.एस. एम. खोमणे यांच्यासह विभागातील सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध झाल्यामुळे विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव प्रा. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर म हाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी 'क्युनोपी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## युवा भिम सेनेच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे : युवा भिम सेनेचे विद्यार्थी आघाडीचे शहर अध्यक्ष गणेश पोटभरे यांच्या २२ व्या वाढदिवसानिमित्त दयानंद महाविद्यालय लातूर समोर युवा भिम सेनेच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.यात २२ रक्तदत्यांनी रक्तदान केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले,.

यावेळी संस्थापक अध्यक्ष पंकजभाऊ काटे, प्रवक्ते सुफी सय्यद शमशोद्दीन, संपर्क प्रमुख पंकज गायकवाड, प्रदेश उपाध्यक्ष महेबुब सय्यद, मुन्ना शेख,दादा डोळसे, विधी सल्लागार ड.विकास ढगे,युवा जिल्हाध्यक्ष शेखर कांबळे, महिला जिल्हाध्यक्षा उमाताई आदमाने, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष भुषण मांदळे, उपाध्यक्ष सिद्धार्थ गवळी, शहराध्यक्ष अजय कांबळे,रोहन रायभोळे, ड.सुनिल म्हस्के ,शिरीष मांदळे, प्रशांत माने, अविनाश जाधव,बंटी पातरे,नागेश डोळसे, रत्नदीप रायभोळे,शुभम वाघमारे,अतिश गायकवाड,शिवदत्त पाटील, मंगेश सोनकांबळे, अभिजीत कांबळे,यश म्हस्के, इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## इंदापूरच्या आश्रमशाळेतील उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद; मतदान शांततेत पार पडले









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर ता. प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट संचलित प्राथमिक, म ाध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत शालेय प्रतिनिधी वार्षिक निवडणूक २०२५ घेण्यात आली. निवडणुकीत शालेय प्रतिनिधीच्या ६ जागांसाठी मतदान घेण्यात आले.१७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

प्राथमिक आश्रमशाळेचे ४ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात होते. ११५ म तदारांपैकी १०२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. प्राथमिक आश्रमशाळेचे एकूण मतदान ८८.६९ टक्के इतके झाले.

माध्यमिक आश्रमशाळेचे ४ जागांसाठी ७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. १७५ मतदारांपैकी १५६ म तदारांनी मतदानाचा हक्क बजावला. माध्यमिकचे ८९.१४ टक्के मतदान पार पडले.

उच्च माध्यमिक आश्रमशाळेत ४ जागांसाठी ६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. ११० मतदारांपैकी ७९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. उच्च माध्यमिकचे ७१.८१ टक्के इतके मतदान पार पडले.

प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या एकूण ४०० मतदारांपैकी ३३७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

संस्थेच्या अध्यक्षा शकुंतला (काकी) मखरे ,कार्याध्यक्ष ॲड. रा-हुल मखरे, संचालक संजय कांबळे यांनी शालेय निवडणूक अधिकारी यांचेकडून निवडणुकीचा आढावा जाणून घेत उम ेदवारांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

संस्थेच्या तिन्ही विभागाचे मिळून ८४.२५ टक्के इतके मतदान झाल्याची माहिती प्राथमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक साहेबराव पवार, माध्यमि क व उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या प्राचार्या अनिता साळवे यांनी पत्रकारांना दिली.

शनिवारी २ ऑगस्ट २०२५ रोजी शांततेत पार पडलेल्या निवडणुकीत १७ उमेदवारांचे भवितव्य मतदान पेटीत बंद झाले असून सोमवारी (दि.४) मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती शालेय निवडणूक अधिकारी यांनी पत्रकारांना दिली आहे.

### प्रशासन-जनतेत संवाद वाढवणारे विविध उपक्रम राबवले जाणार

### उपक्रमास कर्मचाऱ्यांनी दिला उत्स्फूर्त प्रतिसाद

## आरोग्य तपासणी शिबिराने निफाड येथे महसूल सप्ताहाचा आरंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी

महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत, महसूल सप्ताहाच्या औपचारिक उद्घाटनाचा प्रारंभ दि १ ऑगस्ट, शुक्रवार रोजी आरोग्य तपासणी शिबिराने करण्यात आला. निफाड येथील तहसील कार्यालयात झालेल्या या उपक्रमाचे उद्घाटन प्रांताधिकारी डॉ.शशिकांत मंगरुळे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी तहसीलदार विशाल नाईकवाडे प्रमुख उपस्थित होते.

प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही महसूल सप्ताहात जनतेशी थेट संपर्क साधणारे व प्रशासन-जनतेत संवाद वाढवणारे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.याची सुरुवात कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीने झाली असून,यात रक्तदाब, रक्तशर्करा, हिमोग्लोबिन, नेत्रतपासणी आदी चाचण्या करण्यात आल्या. या उपक्रमास कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रांताधिकारी डॉ. मंगरुळे म्हणा-ले,महसूल प्रशासन हा जनतेच्या अडचणींवर तत्काळ कृती करणारा विभाग आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आरोग्य चांगले राहणे ही विभागासाठी महत्त्वाची जबाबदारी आहे.

तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी सांगितले की,महसूल सप्ताह-ात शालेय जनजागृती कार्यक्रम,सेवा सोयींचे वितरण, माहिती अभियान, ई-सेवांबाबत जनजागृती,वृक्षारोपण, महिला सक्षमीकरण संवाद,अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या शिबिरासाठी शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय पथकाची म दत घेण्यात आली होती.या सकारात्म क सुरुवातीने महसूल सप्ताहाचे स्वरूप अधिक लोकाभिमुख ठरणार आहे.

महसूल सप्ताहाच्या माध्यमातून सामान्य नागरिकांपर्यंत महसूल सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचवण्याचा प्रशासनाचा उद्देश आहे. या उपक्रम ांमुळे शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विशेष व्यक्तींना थेट लाभ होणार आहे.

या प्रसंगी डॉ शशिकांत मंगरुळे (उपविभागीय अधिकारी निफाड),विशाल नाईकवाडे (तह-सीलदार निफाड),बाबासाहेब खेडकर (प्रशासन नायब तहसीलदार),राजेंद्र वराडे (निवडणूक नायब तहसीलदार),सविता पठारे (सँगायो नायब तहसीलदार)

सुनील गांगुर्डे ( नायब तहसी-लदार) दिपाली जगताप ( दुय्यम निबंधक निफाड) प्रमोद जाधव ( उपकोषागार अधिकारी) आदी उपस्थित होते तर या कार्यक्रमात निफाड मंडळ अधिकारी प्रशांत तांबे यांचे नायब तहसीलदार पदी पदोन्नती झाले बद्दल सत्कार करण्यात आला.



फोटो

महसूल सप्ताहच्या निमित्त-ाने मार्गदर्शन करतांना डॉ शशिकांत मंगरुळे समवेत तहसीलदार विशाल नाईकवाडे तर दुसऱ्या छायाचित्रात आरोग्य तपासणी प्रसंगी